सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १० नोव्हेंबर २०२५

## ‘जय महाराष्ट्र’ आणि ‘दिलखुलास’ कार्यक्रमात राज्य निवडणूक आयुक्तांची विशेष मुलाखत

मुंबई, दि. १० (रानिआ): माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित दूरदर्शनवरील ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमात ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजता; तसेच आकाशवाणीवरील ‘दिलखुलास’ कार्यक्रमात १२, १३, १४ व १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७.२५ वाजता राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

निवेदक मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे. ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमातील मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरदेखील उपलब्ध होईल. ‘दिलखुलास’ कार्यक्रमातील मुलाखत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर ऐकता येईल; तसेच ती ‘News on AIR’ या मोबाईल ॲपवरही उपलब्ध असेल.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची सध्या लगबग सुरू आहे. पहिल्या टप्प्यात २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यासाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान आणि ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. यासंदर्भात श्री. वाघमारे यांच्याशी या मुलाखतीच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला आहे.

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकृत समाजमाध्यम हॅंडल्स्**

X (Twitter): https://twitter.com/MahaDGIPR

Facebook : https://www.facebook.com/MahaDGIPR

YouTube : https://www.youtube.com/MAHARASHTRADGIPR

०-०-०

(Jagdish More, SECM)